

# श्री संत ज्ञानेश्वर अभंगवाणी-अवचिता परिमळू

https://www.chalisa.online

अवचिता परिमळू, झुळुकला अळुमाळू ।
मी ह्मणु गोपाळू, आला गे माये ॥१॥

चांचरती चांचरती बाहेरी निघाले ।
ठकचि मी ठेलें काय करू ॥२॥

तो सावळा सुंदरू कांसे पीतांबरू ।
लावण्य मनोहरू देखियेला ॥३॥

बोधुनी ठेलें मन तव जालें आन ।
सोकोनी घेतले प्राण माझे गे माये ॥४॥

बाप रखुमादेवीवरू विठ्ठल सुखाचा ।
तेणें काया मने वाचा वेधियेलें ॥५॥

|| https://www.chalisa.online ||